ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICNECED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख ४ जून, १९५८ | अंक ११

## विविध माहिती

**कौलांचे कारखाने बंद**—केरळच्या सरकारनें कौलांच्या कारखान्यांच्या कामगारांसाठी किमान वेतन ठरविल्यामुळें ८० कारखाने त्यांच्या मालकांनीं बंद केले आहेत. त्यामुळें ८,००० कामगार बेकार झाले आहेत. राज्याचे मजूरमंत्री श्री. थॉमस ह्यांनीं हा प्रश्न सोडविण्यासाठी उभय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक बोलाविली आहे.

**कोळ्यांना धंदेवाईक शिक्षण**—म्हैसूर सरकारच्या मच्छीमारी खात्यानें तरुण कोळ्यांना मच्छीमारीचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. कोळ्यांना मच्छीमारीचीं आधुनिक अवजारें आणि यांत्रिक बोटी ह्यांच्या उपयोगाचें शिक्षण देण्यांत येईल. शिक्षणानंतर त्यांना खोल समुद्रांत मासे पकडता येणें सुलभ जाईल.

**अंतराळांतील दुसरा प्रवासी**—रशिआनें दुसऱ्या उपग्रहांत 'लायका' नांवाची कुत्री ठेवून तो अंतराळांत सोडला होता. अशाच प्रवासासाठी आणखी एका कुत्रीला शिक्षण देण्यांत येत आहे. अंतराळांतील ह्या दुसऱ्या प्रवाशानें ह्यापूर्वी पृथ्वीपासून १३० मैल उंच उड्डाण करून परतण्याचा अनुभव घेतला आहे.

**गोहाटी येथील तेलाचा कारखाना**—खाणी आणि तेल-मंत्री, श्री. मालवीय, हे पुढील महिन्याच्या मध्याच्या सुमारास रुमेनिआला जात आहेत. रुमेनिअन् सरकारनें गोहाटी येथील तेलाच्या शुद्धीकरणाचा कारखाना उभारण्याची तयारी दाखविली आहे. भारत सरकारनें रुमेनिआची मदत स्वीकारली असून श्री. मालवीय पुढील वाटाघाटीसाठी तिकडे जात आहेत.

**कटक येथील नवें रेडिओ स्टेशन**—अखिल भारतीय रेडिओचें कटक येथील नवें आकाशवाणी केंद्र नुकतेंच सुरू करण्यांत आलें. ह्या केंद्राची शक्ति २० किलोवॅटची असून त्याची यंत्रसामुग्री कोलंबो मदतयोजनेप्रमाणें ऑस्ट्रेलिआकडून मिळालेली आहे. ह्या प्रसंगीं भारतामधील त्या देशाच्या हाय-कमिशनरकडून शुभसंदेश आला होता.

**त्रिशूल शिखरावर स्वारी**—भारताच्या लष्करांतील दोघा अधिकाऱ्यांनीं हिमालयाच्या त्रिशूल ह्या शिखरावर आरोहण करण्यास प्रारंभ केला आहे. त्यांचें शिक्षण दार्जिलिंग येथील गिर्यारोहण संस्थेंत झालें आहे. त्रिशूल नैनितालपासून १०० मैल उत्तरेला असून २३,००० फूट उंचीचें आहे.

**अपघातांत सांपडलेल्यांना मदत**—राजकोट नजीक कीर्ति एक्सप्रेस ह्या गाडीला झालेल्या अपघातांत सांपडलेल्या आपद्ग्रस्तांसाठी गुजरात चेंबर ऑफ कॉमर्सनें ५,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. अपघातांत सांपडलेल्यांची माहिती चेंबरतर्फे गोळा करण्यांत येणार आहे.

**पांच वर्षे औद्योगिक शांतता**—म्हैसूर पेपर मिल्स असोसिएशनची सर्वसाधारण सभा भद्रावती येथें भरली होती. ह्या सभेंत येत्या पांच वर्षांत कागदाच्या गिरण्यांच्या चालकांशीं करार करून संपूर्ण औद्योगिक शांतता पालन करण्याचा ठराव कामगार सभासदांनीं मंजूर केला.

**टोळधाड विरोधी मोहीम**—पाकिस्तानमध्यें आलेल्या टोळधाडीच्या संकटाला तोंड देण्यासाठी रशिअन सरकारनें मदत देऊं केली असून पाकिस्ताननें ती स्वीकारली आहे. विमानें व टोळांच्या थव्यांवर मारण्यासाठी रसायनें रशिआनें देऊं केलीं आहेत. पाकिस्तानमधील पिकांना टोळांचा फार मोठा धोका उत्पन्न झाला आहे.

**विजेचे बल्ब तयार करण्याचा कारखाना** – केरळ राज्यांत विजेचे बल्ब तयार करण्याचा खाजगी मालकीचा एक कारखाना काढण्यास भारत सरकारनें परवानगी दिली आहे. कारखाना काढण्याच्या कामीं दोन ब्रिटिश कारखान्यांकडून तांत्रिक साह्य घेण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यांत प्रारंभीं २०० लोकांना रोजगार मिळूं शकेल.

**देवळांच्या दुरुस्तीसाठी खर्च**—मद्रास राज्यांतील गरीब स्थितींत असलेल्या देवळांच्या दुरुस्तीसाठी राज्य सरकारनें ४ लाख रुपये मंजूर केले आहेत. देवळांचीं गोपुरें दुरुस्त करणें, त्यांच्या भोंवतालच्या पडलेल्या भिंती पुन्हां बांधणें, इत्यादि कामें वरील रकमेंतून करण्यांत येतील. ज्या देवळांना भरपूर उत्पन्न होतें, त्यांना ह्या योजनेंतून वगळण्यांत आलें आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## फोर्ड फौंडेशनची ग्रामीण विभागांसाठी भरीव योजना

दि २१ मेच्या "अर्था"च्या अंकामध्यें फोर्ड फौंडेशनच्या मदतीनें दिल्लीजवळील खानपूर गांवीं आर्थिक विकासाचा जो प्रयत्न चालूं आहे त्याचें वर्णन आम्ही दिलें होतें. त्यासंबंधीं नुकतीच आणखी कांहीं माहिती उपलब्ध झाली आहे, ती या लेखांत आम्ही देत आहों

आतांपर्यंतच्या ग्रामीण विभागांतील आर्थिक विकासाच्या कोणत्याहि योजनेपेक्षा ही योजना नाविन्यपूर्ण व भरीव आहे. या योजनेचा परिणाम फार व्यापक होण्याची शक्यता आहे. पाणीपुरवठ्यासंबंधीं, वीज निर्मितीकरितां किंवा लहानमोठ्या उद्योगांच्या वाढीसंबंधीं, ग्रामीण विभागांकरितां आपण ज्या योजना व पद्धति आजपर्यंत अवलंबिल्या त्या सोडून देऊन संपूर्ण निराळ्याच तंत्राचा व पद्धतीचा वापर सुरू करावा अशी परिस्थिति येण्याची शक्यता आहे.

या योजनेमुळें आर्थिक विकासाचें कार्य द्रुतगतीनें व कमी खर्चांत होऊं शकेल. उत्पादनाची गति वाढून लवकरच्या काळांत राष्ट्रीय उत्पन्न वाढेल. सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ग्रामीण विभागांत राहणाऱ्या बहुसंख्य प्रजाजनांना कामधंदा मिळून जास्त रोजगार मिळेल.


ही योजना एकूण दहा वर्षांच्या कालावधीकरितां आहे व तिचेवर एकूण आठ हजार कोटि रुपये खर्च करावे लागतील.

वरील योजनेचा आराखडा थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे.

| | प्रतिवर्षी गुंतवावे लागणारें भांडवल ( कोटी रु. ) | खेड्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | ४०० | २०,००० |
| २ | ४४० | २२,००० |
| ३ | ४८४ | २४,२०० |
| ४ | ६३२ | ३१,६०० |
| ५ | ६९६ | ३४,८०० |
| ६ | ७६५ | ३८,२५० |
| ७ | ९४२ | ४७,१०० |
| ८ | १,०३६ | ५१,८०० |
| ९ | १,२४० | ६२,००० |
| १० | १,३६५ | ६८,२५० |
| एकूण दहा वर्षे | ८,००० | ४,००,००० |

### गो. स. पारखे पारितोषिकें

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजतर्फे प्रतिवर्षी देण्यांत येत असलेल्या गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिकांसाठी यंदा ११ अर्ज आले होते. त्यांचा पारितोषिक समितीनें विचार करून ( १ ) पैसा फंड कांच कारखाना, तळेगांव, यांना त्यांच्या रेल्वे सिग्नलिंग ग्लासेसबद्दल रु. १५०, ( २ ) महाराष्ट्र लिथो प्रेस, पुणें, यांना त्यांच्या टेक्स्टाईल गोल्डलीफ ट्रॅन्स्फरबद्दल रु. १०० आणि ( ३ ) सिएम ट्रेडिंग कंपनी, मुंबई यांना त्यांच्या पेपर स्लिव्हजबद्दल रु. १०० अशीं पारितोषिकें देण्याची शिफारस केली आहे. या पारितोषिकांचें वितरण दि. १६ जून १९५८, रोजीं सायंकाळीं ६॥ वाजतां चेंबरमध्यें समारंभपूर्वक होईल.





कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक: -श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



# अर्थ

बुधवार, ता. ४ जून, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांची ठेवीसाठी स्पर्धा

### व्याजाचे दर कसे उतरणार ?

गेलें वर्ष बँकांना, विशेषतः मोठ्या बँकांना चांगलें गेलें. खर्च वाढले तरी उत्पन्नहि वाढलें आणि त्यामुळें त्यांचे नफेहि वाढले. ठेवींतील वाढीस अमेरिकन मदतीचे फंडांचे सांचलेले पैसे कारणीभूत झाले असले, तरी नव्या ठेवीहि बऱ्याच आल्या. एका वर्षापूर्वींची परिस्थिति वेगळी होती; त्यावेळीं ठेवींतील वाढ अतिशय मंद होती आणि कर्जे देण्यास पैशाचा तुटवडा पडून व्यापार–उद्योगधंदे त्यामुळें अडचणींत येतील अशी भीति निर्माण झाली होती. परंतु आतां ठेवी वाढल्या असून कर्जांची मागणी मंदावली आहे. त्यामुळें ठेवी–कर्जांचें प्रमाण समाधानकारक झालें आहे. रिझर्व्ह बँकेचा "सिलेक्टिव्ह क्रेडिट कंट्रोल" त्यास अंशतः कारणीभूत आहे.

आयातीवरील निर्बंधांमुळें औद्योगिक वाढीला आळा बसला आहे आणि शेतीचें उत्पादन वाढलेलें नाहीं; मुख्यतः त्यामुळेंच कर्जांची मागणी मर्यादित राहिलेली आहे. आयातीवरील नियंत्रणें लवकर उठण्याचा संभव नाहीं आणि शेतीचें उत्पादनहि फारसें सुधारणार नाहीं. सहाजीकच आर्थिक व्यवहारांना विशेष तेजी कांहीं काळ तरी येणार नाहीं. बँकांनीं ठेवी घेण्यासाठी जी तीव्र स्पर्धा चालविली आहे, तिचें पुढें काय होणार ? असा प्रश्न सहाजीकच उपस्थित होतो. इतके दिवस ठेवींसाठी स्पर्धा केली; ह्यापुढें कर्जे देण्यासाठी स्पर्धा सुरू होणार कीं काय ? बँकांच्या अध्यक्षांनीं आपल्या भाषणांतून ठेवींवरील भरमसाट व्याजाच्या दराविषयीं चिंता व्यक्त केली, तिच्यामागें ह्या शक्यतेची टोंचणी बहुधा असेल.

बँकांच्या ठेवींवरील व्याजाचे दर कमी केले जावे, त्यासंबंधीं सहकार्यानें प्रयत्न करावे, असें नेहमीं सांगितलें जातें. पण प्रत्यक्ष तसें घडून येणें अवघड असतें. युनायटेड बँक ऑफ इंडियाचे चेअरमन, डॉ. एन् ए. लॉ ह्यांनीं आपल्या भाषणांत फारच कडक उपाय सुचविला आहे. सरकारनेंच व्याजाच्या दरांवर कायद्यानें नियंत्रण घालावें, असें त्यांचें म्हणणें आहे सरकारनें असा हस्तक्षेप केला, तर तो तेथेंच थांबूं शकेल का ? ठेवींवरील व्याजाचे दर नियंत्रित केल्यावर कर्जांवरील व्याजाचे दर अनियंत्रित कसे रहाणार ? पण, कर्जावरील व्याजाचे दर बँकांनींच आपल्या सोईप्रमाणें ठेवावे म्हणजे बँकांना आपले रिझर्व्ह वाढवितां येतील, असें डॉ. लॉ ह्यांचें म्हणणें आहे. कर्जे देण्याचे बाबतींत बँकांना एकमेकांशीं स्पर्धा करण्याची पाळी आली, म्हणजेच ठेवींवरील व्याजाचे दर कमी करण्याची आवश्यकता निर्माण होईल, असें दिसतें.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या ठेवींत गेल्या वर्षीं १६ कोटी रुपयांची वाढ झाली; कोणत्याहि वर्षीं एवढी वाढ झाली नव्हती. "इतर बँकांच्या व्याजाच्या दरापेक्षा आपले दर कित्येक वेळां थोडे कमीच होते" असें बँकेचे अध्यक्ष सर होमी मोदी ह्यांनीं सांगितलें. पंजाब नॅशनल बँकेचे अध्यक्ष श्री. शांतिप्रसाद जैन ह्यांनीं सांगितलें, कीं पंजाब नॅ. बँकेलाहि कांहीं काळ स्पर्धेत भाग घ्यावा लागला, पण वर्षांतले कांहीं दिवस बँकेनें अनिष्ट स्पर्धा केली नाहीं. कोणती बँक किती व्याज देऊं करते, हें बाजारांतील संबंधित लोकांना माहीत असतें; हे दर जाहीर होत नसतात. त्यामुळें, त्या दरांची तुलना करतां येत नाहीं. बँकांच्या धोरणांत एकवाक्यता आणण्यासाठी श्री. हंडू ( स्टेट बँकेचे त्यावेळचे मॅनेजिंग डायरेक्टर ) ह्यांच्या अध्यक्षतेखालीं पूर्वी एक कमिटी नेमण्यांत आली होती, परंतु त्यांतून कांहींहि निष्पन्न होऊं शकलें नाहीं म्हणून आतां डॉ. लॉ ह्यांनीं ह्या विषयाला पुनः चालना दिलेली दिसते. गेल्या कांहीं महिन्यांतील घटनाच तशा महत्त्वाच्या आहेत. भरमसाट दरानें ठेवी घेऊन त्या गुंतवण्यास पुरेसा वाव नाहीं. बिल मार्केट योजनेखालील रिझर्व्ह बँकेकडील कर्जे कमी झालीं आहेत. बँकां–बँकांतील शॉर्ट टर्म ठेवी मात्र वाढत आहेत; त्यामुळें 'कॉल मनी' आणि 'टर्म मनी' ह्यांतला फरकच नाहींसा होत चालला आहे. रिझर्व्ह बँकेनें शेड्यूल्ड बँकांना आपलीं कर्जे कमी करण्याची सूचना दिली, त्यामुळें वाढत्या ठेवींच्या गुंतवणुकीस वाव कमी उरला आणि बँका इतर बँकांकडे ठेवी ठेवूं लागल्या. म्युनीसिपालिट्या, लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन, स्टेट ट्रॅन्स्पोर्ट, हाऊसिंग बोर्ड, चॅरिटी फंड, इत्यादींनाहि 'शॉर्ट टर्म' ठेवींत भारी दरानें पैसे गुंतविण्याची संधि मिळाली. सरकारी रोख्यांतरील व्याजापेक्षा ह्या ठेवींत व्याज चांगलें मिळतें. अशा रीतीनें ठेवींवरील व्याजाच्या दरांत अनिष्ट स्पर्धा चालू आहे. त्याचा सरकारी कर्जउभारणीवरहि दुष्परिणाम झाल्याविना रहाणार नाहीं.

---

## भारतास २,८५,५५५ डॉलरचें तांत्रिक साह्य

### आठ भारत–अमेरिका करारांवर स्वाक्षऱ्या

भारत व अमेरिकेच्या सरकारांनीं आठ भारत अमेरिका कार्यक्रम करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या करारानुसार भारतास अमेरिकेकडून जमिनीखालील पाण्याचें संशोधन, पशुधनांत सुधारणा, औद्योगिक संशोधन, आरोग्य, शेतकी व सहकारी सदस्यत्व इ. क्षेत्रांत २ ८५,५५५ डॉलरचें आर्थिक साह्य मिळेल. भारतास अमेरिकेकडून १९५८ मध्यें तांत्रिक साह्यादाखल मिळणाऱ्या ६·३ दशलक्ष डॉलर मदतीचा हा एक भाग आहे.

---

### साखरेचें उत्पादन व रवानगी

चालू हंगामांत १५ मे १९५८ पर्यंत देशी साखरेचें उत्पादन १९·४७ लक्ष टन झालें आणि १०·८२ लक्ष टन साखर रवाना करण्यांत आली. गतवर्षींच्या याच कालखंडांतील हे आंकडे अनुक्रमें १९·१३ लक्ष टन व ११·७० लक्ष टन असे होते.

साखर कारखान्यांपाशीं १५ मे, १९५८ रोजीं १२·९० लक्ष टन साखर शिल्लक होती. गतवर्षी याच दिवशींचा हा आंकडा १२·७० लक्ष टन असा होता.

## परदेशी प्रवाशांसाठी उत्कृष्ट दर्जाचीं हॉटेलें

### सरकारी समितीचा अहवाल

परदेशांतील प्रवाशांस भारतांत उपलब्ध असलेल्या पथिकाश्रमांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आणि या पथिकाश्रमांचे दर त्यांच्या प्रत्यक्ष दर्जानुसार ठेवण्याकरितां या देशांतील सरकारमान्य पथिकाश्रमांचे पांच वर्ग पाडण्यांत यावेत व या वर्गीकरणासाठी सर्वांस परिचित अशा स्टार सिस्टिमचा अवलंब करावा, असें हॉटेल्स स्टॅण्डर्ड्स ॲण्ड रेट स्ट्रक्चर कमिटीनें आपल्या अहवालांत म्हटलें आहे. प्रत्येक प्रकारच्या वर्गीकरणाबाबत या समितीनें तपशीलवार गमकें दिलीं आहेत.

संसदेचे सदस्य श्री. दिवाण चमनलाल हे भारत सरकारनें नेमलेल्या या समितीचे अध्यक्ष होते. या समितीनें भारताचा व्यापक दौरा करून शंभराहून अधिक पथिकाश्रमांस भेट दिली. या कामांत समितीनें ३०० हून अधिक लोकांच्या साक्षी घेतल्या आणि सुमारें तितक्याच लोकांनीं या समितीच्या प्रश्नावलीस उत्तरें पाठविलीं.

उपरोक्त वर्गीकरण प्रत्यक्षांत अंमलांत येण्यापूर्वी पथिकाश्रमांच्या मालकांना विशिष्ट वर्गांत आपला पथिकाश्रम आणूं देण्यासाठी पुरेसा अवधि द्यावा, अशी शिफारस या समितीनें केली आहे.

या वर्गीकरणासाठी आणि पथिकाश्रम धंद्याच्या दैनंदिन प्रश्नांकडे लक्ष देण्यासाठी एका कायदेशीर समितीची स्थापना करावी अशी समितीनें शिफारस केली आहे. या समितींत पथिकाश्रम धंद्याचे दोन प्रतिनिधि, ग्राहकांच्या हितसंबंधाकडे पाहणारा एक प्रतिनिधि व भारत सरकारच्या प्रवासी व्यवसायखात्याचा एक प्रतिनिधि (हा प्रतिनिधि सदर समितीचा अध्यक्ष असेल) इतके सदस्य असावे.

परदेशांतून येणाऱ्या सध्यांच्या प्रवाशांची संख्या व भविष्यकालांत त्यांत होणारी वाढ यांशीं तुलना करतां भारतांतील पथिकाश्रमांतील खाटांची संख्या अत्यल्प असल्याचें समितीचें मत आहे. मोरोक्को व लेबनॉन यांसारख्या लहान देशांतहि पथिकाश्रमांत राहण्याची अधिक सोय आहे आणि म्हणून या व्यवस्थेंत तावडतोब मोठ्या प्रमाणांत वाढ करण्याची आवश्यकता असल्याचें समितीनें म्हटलें आहे.

भारतांतील पथिकाश्रमांत समान दरआंखणीची पद्धत नसल्याचें समितीला दिसून आल्यानें तिनें या देशास सोईस्कर होईल अशा रीतीनें अमेरिकन हॉटेल्स असोसिएशननें स्वीकारलेल्या 'ह्वार्ट फॉर्म्युल्यांत' बदल करून तो अंमलांत आणण्याची शिफारस केली आहे. हा फॉर्म्युला तयार करतांना पथिकाश्रमाचें एकूण भांडवल, तें चालविण्यासाठी येणारा एकूण खर्च, होणारें एकूण उत्पन्न, वर्षभर उपलब्ध असलेली राहण्याची व्यवस्था व भांडवलावर सुमारें १० टक्के नफा. इ. गोष्टी विचारांत घेण्यांत येतात.

भारताच्या कांहीं भागांतील पथिकाश्रमांच्या दरांत फेरबदल करण्याची आवश्यकता आहे ही गोष्ट निदर्शनास आणतांनाच समितीनें मुंबईसारख्या राज्यांतील कडक दर-नियंत्रण रद्द करण्याची शिफारस केली आहे.

पथिकाश्रम धंद्यास लागू असलेल्या दारूबंदीच्या नियमाबाबत समितीनें दारूबंदीचें धोरण हा भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शनात्मक तत्त्वांचा एक भाग असल्यानें त्याबाबत आक्षेप घेतांच येणार नाहीं ही गोष्ट स्पष्ट केली आहे. तथापि भारतांतील निरनिराळ्या राज्यांत ठिकठिकाणीं या धोरणाबाबतच्या नियमांच्या अंमलबजावणींत फरक असल्यानें त्याचा पथिकाश्रम धंद्यावर प्रतिकूल परिणाम झाला आहे, इतकेंच नव्हे तर त्यामुळें कांहीं ठिकाणीं पथिकाश्रमांचे दर अवास्तव वाढले असल्याचें समितीनें म्हटलें आहे. भारतांतील कांहीं भागांत लागू करण्यांत आलेल्या दारूबंदी नियमामुळें या देशांत प्रवाशांचा ओघ वाढण्यास प्रतिबंध होतो, असें मत या समितीनें व्यक्त केलें आहे.

पथिकाश्रमांचा धंदा हा खाजगीरीत्या चालविण्यांत यावा असें या समितीचें मत आहे. परंतु खासगी क्षेत्र या बाबतींत जेथें कमी पडत असेल आणि त्यामुळें या देशांतील प्रवासी वाहतूक व्यवसायाच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होत असेल तेथें राज्य सरकारांनीं वा मध्यवर्ती सरकारनें पुढें येऊन प्रवाशांस आवश्यक त्या सोई करून द्याव्यात असें या समितीचें मत आहे.

---

**भोपाळमध्यें नव्या इमारती**—मध्यप्रदेशाची राजधानी भोपाळ येथें सरकारला कचेऱ्यांसाठी लागणाऱ्या इमारती पुरेशा नाहींत. ही टंचाई दूर करण्यासाठी सरकारनें इमारती बांधण्याची एक मोठी योजना तयार केली आहे. सरकारी इमारतींसाठी सुमारें ३६७ एकर जमीन राखून ठेवण्यांत आली आहे.

**मागासलेल्या कम्युनिस्ट राष्ट्रांना मदत**—वॉरसा येथें कम्युनिस्ट गटांतील देशांची एक परिषद् भरली होती. ह्या परिषदेंत कम्युनिस्ट गटांतील जे देश औद्योगिक दृष्ट्या मागासलेले असतील, त्यांना मोठ्या प्रमाणावर मदत करण्याचें ठरविण्यांत आलें.

**पीकिंगमधील स्वच्छतेची मोहीम**—पीकिंगमधील हजारों नागरिकांनीं शहराच्या स्वच्छतेच्या मोहिमेंत भाग घेण्यास प्रारंभ केला आहे. शहरांतील माशा, उंदीर, डांस व चिमण्या ह्यांच्या उच्चाटनासाठी ही मोहीम सुरू करण्यांत आली आहे. पीकिंग शहराच्या ड्रेनेजमध्यें गंधकाचें मिश्रण सोडून तें साफ करण्यांत येणार आहे.

**होमिओपाथीला उत्तेजन**—भारतामधील जनता गरीब असल्यामुळें पाश्चात्य पद्धतीचे खर्चाचे उपचार तिला परवडण्यासारखे नाहींत. म्हणून होमिओपाथीसारख्या स्वस्त औषधोपचाराच्या पद्धतीला अधिक उत्तेजन दिलें पाहिजे, असें मत राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांनीं व्यक्त केलें आहे.

**मलाया-जपान आर्थिक संबंध**—मलाया व जपान ह्या दोन देशांचे आर्थिक संबंध अधिक निकटचे करण्याबद्दल उभयता देशांच्या पंतप्रधानांचें एकमत झालें आहे. जपाननें मलायांत भांडवल गुंतवावें आणि मलायानें जपानी मालाला बाजारपेठ द्यावी, अशा स्वरूपाच्या वाटाघाटी करण्यांत येण्याचा संभव आहे.

**लष्करी अधिकाऱ्यांची सोय**—पंजाबमध्यें काम करणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांची व लष्करांतील इतर लोकांची रहाण्याची सोय करण्यासाठी इमारती बांधण्याची मोठी योजना आखण्यांत आली आहे. इमारतींसाठी १ कोटी रुपये खर्च येईल. अधिकाऱ्यांना कुटुंबासह राहण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे.

## कुटुंबनियोजनाचा खेड्यांत प्रसार

भारत सरकारच्या आरोग्यखात्यानें कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाची खेड्यांतील अंमलबजावणी चालू आर्थिक वर्षांत अधिक कसोशीनें करण्याचें ठरविलें आहे. ग्रामीण भागांतील कांहीं निवडक खेड्यांतून कुटुंबनियोजनाविषयीं सल्ला देणारीं ३०० नवी केंद्रें उघडण्याचें सरकारनें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें शहरी भागांतहि अशीं ८० केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. ग्रामीण भागांत अशा प्रकारचीं जीं खाजगी केंद्रें कार्य करीत आहेत, त्यांचा सर्व खर्च सोसण्याच्या एका योजनेचाहि सरकार विचार करीत आहे. समाजविकास योजना आणि राष्ट्रीय विस्तार योजना ह्यामध्यें जीं आरोग्यविषयक केंद्रें काम करीत आहेत त्यांना कुटुंबनियोजनाचीं खेड्यांतील केंद्रें जोडण्यांत येणार आहेत. निरनिराळ्या राज्यांतील कुटुंबनियोजन केंद्रांची संख्या पुढीलप्रमाणें राहील. आंध्र २६; बिहार ३८; मुंबई ३५; केरळ १२; मध्यप्रदेश २३; मद्रास २३; म्हैसूर १४; ओरिसा १४; पंजाब व राजस्थानमध्यें प्रत्येकी १३; उत्तर प्रदेश १५; पश्चिम बंगाल १८ आणि जम्मू व काश्मीर ४. भारत सरकारनें खेड्यांतील कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमासाठी १३.६५ लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. ही रक्कम संकल्पित ३०० केंद्रांवर खर्च केली जाणार आहे. शहरी भागांतून जीं ८० केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत त्यांच्यावर ७.२८ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. ३.७४ लाख रुपये सध्यां असलेलीं केंद्रें चालू ठेवण्यासाठी खर्च करण्यांत येणार आहेत. चालू आर्थिक वर्षांत मध्यवर्ती सरकार ह्या कामासाठी एकूण ४६ लाख रुपये खर्च करणार आहे.

---

## टाटा कंपनीच्या विस्तार–योजनेला अडथळा?

टाटा स्टील अँड आयर्न कंपनीच्या जमशेटपूर येथील कारखान्यांतील कामगारांनीं केलेल्या संपामुळें कंपनीनें आखलेल्या उत्पादन वाढविण्याच्या योजनेंत अडथळे उत्पन्न झाले आहेत. टाटा कंपनीनें अमेरिकेंतील कैसर कंपनीच्या सहकार्यानें पोलादाचें वार्षिक उत्पादन १० लाख टनांवरून २० लाख टनांपर्यंत वाढविण्याची योजना तयार केली होती, आणि त्याप्रमाणें कारखान्याच्या विस्ताराच्या कामाला प्रारंभहि झाला होता. ह्या विस्तार-योजनेसाठी १३.६ कोटी डॉलर्स खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ज्या अमेरिकन कंत्राटदारांकडे विस्ताराचें काम देण्यांत आलें होतें, त्यांनीं १८,००० कामगारांना आपल्याकडे कामावर घेतले होते. त्यापैकी बहुतेक कामगार संपांत सामील झाले नाहींत असें समजतें. तरी सुद्धां संप, अफवा आणि कायदा न जुमानण्याची वातावरणांत पसरलेली वृत्ति ह्यांच्यामुळें अमेरिकन कंत्राटदारांकडे काम करणाऱ्या कामगारांची हजेरीसुद्धां संपाच्या कालांत ५० ते ५५ टक्केच होती, असें जाहीर करण्यांत आलें आहे. अर्थातच कैसर कंपनीला ठरलेल्या वेळांत आपलें काम पूर्ण करतां न येण्याचा संभव उत्पन्न झाला आहे. टाटा कंपनीच्या विस्तार–योजनेंत काम करण्यासाठी बरेच अमेरिकन तज्ज्ञ जमशेटपूरला १९५६ मध्यें आले. त्यांची एक स्वतंत्र वसाहतच विमानतळाजवळ आहे. सुमारें ९० अमेरिकन कुटुंबांची रहाण्याची सोय ह्या अद्यावत् व विलासी वसाहतींत करण्यांत आली आहे. ह्या कुटुंबांपैकी २० कुटुंबें आपलें काम संपल्यानें आतां अमेरिकेंत परत गेलीं आहेत.

---

## रशिअन शास्त्रज्ञांना मानाचें स्थान

कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रो. थॅकर ह्यांच्या नेतृत्वाखाली १५ भारतीय शास्त्रज्ञांचें एक मंडळ रशिआचा दौरा करण्यासाठी गेलें होतें. आपल्या तीन आठवड्यांच्या दौऱ्यांत मंडळानें रशिआंतील शास्त्रीय संशोधन संस्थांना भेटी दिल्या. मंडळाचे पुढारी प्रो. थॅकर भारताला परत आल्यावर म्हणाले, कीं रशिआंत शास्त्रज्ञांना सर्वांत अधिक मेहनताना मिळतो. सोव्हिएट रशिआंत शास्त्रीय विषयांच्या बाबतींत तात्त्विक व व्यावहारिक अशा दोन्ही प्रकारचें संशोधन मोठ्या प्रमाणावर चालूं आहे. शास्त्रांच्या तांत्रिक उपयोगाच्या बाबतींतहि रशिआनें खूपच प्रगति केलेली आहे. पदार्थविज्ञानशास्त्र, गणित, रसायन आणि धातुशास्त्र ह्या विषयांच्या तंत्रविज्ञानाच्या खास संस्था आहेत आणि त्यामधून करण्यांत येणाऱ्या कामाचा दर्जा उच्च प्रतीचा आहे. तांत्रिक ज्ञानाच्या शिक्षणाच्या बाबतींत रशिआनें फारच विशाल दृष्टीकोन स्वीकारला आहे. पुष्कळशा संशोधनसंस्था ह्या प्रायोगिक कारखान्यांसारख्याच आहेत. चालू वर्षी रशिआंतील उच्च शिक्षणसंस्थांतून १,००,००० एंजिनिअर्स शिक्षण घेऊन बाहेर पडतील. भारताच्या प्रगतिविषयीं बोलतांना ते पुढें म्हणाले कीं, भारतांत शास्त्रें व तंत्रविषयक ज्ञान ह्यांच्याविषयीं ज्या मानानें आस्था दाखविण्यांत येईल त्यामानानें प्रगति कमी-अधिक वेगानें होईल. ह्याबाबतचें सरकारचें धोरण लोकसभेंत नुकत्याच मांडण्यांत आलेल्या शास्त्रविषयक धोरणाबाबतच्या ठरावांत स्पष्ट करण्यांत आलेलें आहे.

---

## मिरीच्या व मसाल्याच्या पदार्थांच्या बाजारपेठा

परदेशीय हुंडणावळीच्या टंचाईमुळें भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणींत अडथळे उत्पन्न होत आहेत. अशा वेळीं ज्या मालाच्या निर्यातीमुळें परदेशी चलन प्राप्त होतें त्याला अर्थातच फार महत्त्व आहे. केरळ राज्यांतून मिरी व मसाल्याचे इतर पदार्थ अमेरिका, ब्रिटन, इत्यादि देशांना निर्यात करण्यांत येतात. ह्या मालाचा फार मोठा पुरवठा भारताकडून होत असल्यामुळें ह्या बाबतींत भारताकडे एक प्रकारची मक्तेदारी आली होती. पण आतां तशी परिस्थिति राहिलेली नाहीं. इंडोनेशिआ आणि सारावाक ह्या ठिकाणीं दुसऱ्या महायुद्धानंतर मिरीं व मसाल्याचे इतर पदार्थ ह्यांच्या लागवडीस प्रारंभ करण्यांत आला. त्यानंतर गेल्या कांहीं वर्षांत तेथील मिऱ्यांच्या उत्पादनांत चांगलीच प्रगति करण्यांत आली. ह्या पदार्थांच्या लागवडीखाली अधिकाधिक जमीन आणण्यांत आली असून त्यांचा दर्जाहि लागवडीच्या शास्त्रीय पद्धतीमुळें सुधारण्यांत आला आहे. उत्पादन वाढूं लागल्यामुळें आतांपर्यंत भारताच्या म्हणून गणल्या गेलेल्या खास परदेशी बाजारपेठांतहि इंडोनेशिआचा माल मोठ्या प्रमाणावर येऊं लागला आहे. ह्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी इंडिअन पेपर अँड स्पाइस ट्रेड असोसिएशननें एक योजना आखली आहे. इंडोनेशिआंत वरील पदार्थांच्या लागवडीबाबत ज्या सुधारणा करण्यांत आल्या आहेत त्या तर केरळमध्यें करण्यांत येणार आहेतच, पण इंडिअन कौन्सिल फॉर ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेच्या सल्ल्याचा फायदा घेऊन शास्त्रीय पद्धतीनें मशागत करण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

---

## मशीन टूल्सच्या किंमती बऱ्याच प्रमाणांत कमी झाल्या

### ग्राहकांना प्रत्यक्ष फायदा मिळणार

हिंदुस्थान मशीन्सच्या किंमती बऱ्याच प्रमाणांत कमी करण्यांत आल्या असल्याचें बंगळूर येथील सरकारी मालकीच्या हिंदुस्थान मशीन टूल्स कंपनीनें जाहीर केलेल्या निवेदनावरून दिसून येतें. १००० मिलीमीटरच्या लेथला आतांपर्यंत ३६,००० रुपये पडत त्यासाठी आतां २९,५०० रुपये पडतील, एक जून १९५८ पासून नोंदविण्यांत आलेल्या मागण्यांना याच दरानें मशीन्स पुरविलीं जातील.

सन १९५६ मध्यें या कारखान्यांत लेथ तयार होऊं लागले त्यावेळीं लेथची किंमत ३९,००० रुपये ठरविण्यांत आली होती. अशाच प्रकारच्या आयात केलेल्या स्विस लेथची किंमत ४०,५०० रुपये पडे. गेल्या वर्षी १ जूनपासून ही किंमत कमी करून ३६,००० रुपये करण्यांत आली.

पंधराशें मिलिमीटर लेथची आणि सहा प्रकारच्या मिलिंग मशीन्सच्या विक्रीच्या किंमतीहि अधिकाधिक प्रमाणांत कमी करण्यांत येत आहेत. या कंपनीनें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं यंत्रें परदेशांहून आयात केलेलीं अशाच प्रकारचीं यंत्रें जेवढ्या किंमतीला पडतील त्याहून कमी किंमतीला मिळावी हा यामागील उद्देश आहे.

गेल्या वर्षापेक्षा आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत या वर्षासाठी ठरविलेल्या उत्पादन लक्ष्यापेक्षा तिप्पटीनें उत्पादन वाढल्यानें उत्पादनखर्चांत फार मोठी कपात झाली व अशा प्रकारें किंमती कमी करणें शक्य झालें.

## दि बँक ऑफ औंध लि.

दि. बँक ऑफ औंध लि. नें १९५७ मध्यें उत्कृष्ट प्रगति केली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ९,३२९ रु. नफा झाला. ठेवींत सुमारें दीड लक्ष रुपयांची वाढ झाली. बँकेची स्मॉल सेव्हिंग्ज डिपॉझिट योजना अधिकाधिक लोकप्रिय होत आहे. कंपनीकायद्याप्रमाणें बँक ही 'गव्हर्मेंट कंपनी' झाली आहे; सरकारी ऑडिटरांनीं १९५६ चे हिशेब तपासले असून त्यांना बँकेचें कामकाज समाधानकारक वाटलें आहे. नफ्यापैकी १९०० रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करून, २,००० रु. ची इन्कमटॅक्स व सुपरटॅक्सची तरतूद करून, ७,०० रु. इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह फंडांत घालून ३,५०० रु. बुडीत व संशयित कर्जासाठी राखून ठेवले आहेत. बँकेच्या प्रगतीचा तक्ता सोबत दिला आहे. बँक ऑफ औंधला संस्थानच्या विलिनीकरणानंतर अवघड परिस्थितींतून जावें लागलें होतें; परंतु काळजीपूर्वक व्यवहार करून चालकांनीं बँकेला सुस्थिति प्राप्त करून दिली आहे.

## देशी शाईचा दर्जा सुधारण्यासाठी राष्ट्रीय पदार्थ-विज्ञान प्रयोगशाळेचें संशोधन

राष्ट्रीय पदार्थविज्ञान प्रयोगशाळेनें न फुटणारी निरनिराळ्या प्रकारची काळी शाई तयार करण्याच्या पद्धति शोधून काढल्या आहेत. ह्या शाईत केलेल्या छपाईतील शाई पुष्कळ काळपर्यंत फुटणार नाहीं आणि एकजिनसीपणा टिकून राहील या दृष्टीनें तिच्यांत अधिक द्रव्यें मिसळण्यांत आलीं आहेत हें तिचें वैशिष्ट्य आहे.

प्रिंटिंग, डुप्लिकेटिंगसाठी लागणारी आणि तशाच स्वरूपाची इतर प्रकारची शाई भारतांत पुष्कळच खपते. रोटरी मशिननें होणाऱ्या छपाईसाठीच केवळ दरवर्षी २०,००० रत्तल शाई लागते. डुप्लिकेटिंगसाठी २·५ लक्ष रत्तल शाईची गरज असावी असा अंदाज आहे. इतर विविध प्रकारची शाई दरवर्षी ८०,००० रत्तल लागते. शैक्षणिक दर्जा आणि साक्षरता यांच्या वाढत्या प्रमाणानुसार ही गरज आणखी वाढेल.

वृत्तपत्रांच्या छपाईसाठी लागणाऱ्या शाईपैकी पुष्कळशी शाई परदेशांतून आयात करावी लागते. भारतांतील कांहीं थोड्या फर्ममध्यें एकाद्या दुसऱ्या प्रकारची शाई छोट्या प्रमाणावर तयार करण्यांत येत असली तरी तिच्या दर्जामध्यें सुधारणा होण्यास खूपच वाव आहे. भारतांत तयार होणाऱ्या शाईतील रंगद्रव्यें वेगवेगळीं होऊन तीं तळांत जमून बसतात. हा देशी शाईत सर्रास आढळणारा दोष दूर करण्यास ह्या पद्धतीचें साह्य होईल. शिवाय, ह्या पद्धतीनें तयार केलेली शाई आर्थिक दृष्ट्याहि परवडण्यासारखी असते असें प्रयोगांतीं दिसून आलें आहे. ही पद्धति अगदीं सुलभ असून छोट्या आणि मोठ्या प्रमाणावर त्यांचा उपयोग करतां येईल.

शाईचे व्यापारी प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी ह्या पद्धतींचा उपयोग करण्याची इच्छा असलेल्या कारखानदारांनीं सेक्रेटरी नॅशनल रीसर्च डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, मंडी हाऊस, लिटन रोड, नवी दिल्ली, या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

**रोखीचीं पिकें काढण्याकडे कल**—गुजरातमधील शेतकरी अन्नधान्याची पैदास करण्यापेक्षा रोखीचीं पिकें काढण्याकडे अधिकाधिक लक्ष देऊं लागले असल्याबद्दल गुजरातमधील भूदान कार्यकर्ते श्री. रविशंकर महाराज ह्यांनीं चिंता व्यक्त केली आहे. गुजरातमधील शेतीचा समतोलपणा राखण्यासाठीं लवकरच कांहीं उपाय योजले पाहिजेत असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

**बँक आफ औंधच्या प्रगतीचा तक्ता**

| वर्ष | वसूल भाग भांडवल | रिझर्व्ह व इतर फंड | ठेवी | कर्जे | इन्व्हेस्टमेंट्स | खेळतें भांडवल | नफा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| १९४० | १,३१,००० | ३४,००० | ७,५२,००० | ६,९५,००० | ५०,००० | ९,५६,००० | ३,००० |
| १९४५ | १,४२,००० | ३९,००० | १३,५२,००० | ६,१७,००० | ५,८१,००० | १५,६८,००० | ९,००० |
| १९५२ | १,६८,००० | ५५,००० | ९,६७,००० | ६,२३,००० | ५,९१,००० | १३,२१,००० | २,३०० |
| १९५५ | १,७०,५०० | ६३,९०० | १२,५५,००० | ६,६८,००० | ४,९६,००० | १६,०९,००० | ५,००० |
| १९५६ | १,७०,५०० | ६७,४०० | १३,९३,००० | ७,७९,००० | ५,५३,००० | १७,४३,००० | ७,००० |
| १९५७ | १,७०,५०० | ७१,३०० | १५,४०,००० | ८,५७,००० | ५,५२,००० | १९,०८,००० | ९,३०० |

## पांच गुदामें स्थापण्यांत येणार

### मध्यवर्ती मंडळाचा निर्णय

मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्याचे चिटणीस श्री. के. आर. दामले यांच्या अध्यक्षतेखाली सेंट्रल वेअरहाउसिंग कॉर्पोरेशनच्या संचालक मंडळाची बैठक गेल्या आठवड्यांत भरली होती. अमरावती, सांगली, वारंगळ (आंध्र), चांदौरी (उत्तर प्रदेश) व दावणगिरी (म्हैसूर) येथें गुदामें बांधण्याचा निर्णय या बैठकींत घेण्यांत आला. हीं पांच गुदामें बांधण्यासाठी चालू आर्थिक वर्षांत सुमारें १० लाख रु. खर्च होतील. गुदामें बांधण्याच्या प्रश्नाचा अधिक विचार केल्यानंतर या वर्षांत आणखी दोन गुदामें बांधण्याचें काम हातीं घेण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या राज्यांत वेअरहाउसिंग कॉर्पोरेशनें स्थापण्याच्या प्रश्नावर या बैठकींत विचार होऊन आंध्रप्रदेश, पंजाब, ओरिसा, राज्यांसाठी प्रत्येकी पांच संचालकांची नियुक्ति करण्यांत आली.

### नवी दिल्ली येथील अभिनव अ. भा. प्रदर्शन

नवी दिल्ली येथें येत्या ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्यें "भारत १९५८" या नांवाचें अ. भा. प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. अशा स्वरूपाचें हें पहिलें प्रदर्शन असून तें मध्यवर्ती अर्थ आणि व्यापार व उद्योग खात्यांनीं संयुक्तपणें पुरस्कारिलेलें आहे. देशांतील खासगी तसेंच सरकारी क्षेत्रांतील निरनिराळ्या उद्योग-धंद्यांची व विकासात्मक कार्यांची प्रसिद्धि होण्यास आणि भारतीय माल व तयार वस्तू यांच्या निर्यातीस चालना मिळण्यास या प्रदर्शनानें मदत होईल.

जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणें–निधि आणि इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन व आंतरराष्ट्रीय विमान वहातुक संस्था या 'यूनो'च्या तीन खास संघटनांच्या वार्षिक परिषदाहि येथेंच ऑक्टोबरमध्यें भरणार असून याच वेळीं हें प्रदर्शन भरणार आहे. यामुळें या देशाच्या आर्थिक व औद्योगिक विकासासंबंधीं जगांत आस्था निर्माण होण्यास चांगली संधि मिळणार आहे.

या प्रदर्शनांत भारतीय उद्योगधंदे, व्यापार, कला व संस्कृति यांचें दर्शन घडविण्यांत येणार आहे. यामुळें खासगी व सरकारी क्षेत्रांतील सर्व उद्योगधंदे, इतर विकासात्मक कामें, राष्ट्ररचनेचीं कार्यें यांचा त्यांत समावेश असेल. मध्यवर्ती सरकारचीं सर्व संबंधित खातीं या प्रदर्शनांत भाग घेणार असून सर्व राज्य सरकारेंहि सहभागी होतील असा अंदाज आहे.

मध्यवर्ती व्यापार व उद्योग खात्यांतील प्रदर्शन विभागा-तर्फे या प्रदर्शनाची सर्व आंखणी व व्यवसाय होणार असून तें ऑक्टोबर १९५८ पासून सुरू करावें व नोव्हेंबर अखेरीपर्यंत चालू ठेवावें असें ठरविण्यांत आलेलें आहे. दिल्ली–मथुरा मार्गावरील प्रदर्शन मैदानावर तें भरविण्यांत येईल.

हें प्रदर्शन संपूर्णपणें राष्ट्रीय स्वरूपाचें राहील. या देशांत जुळणी करण्यांत येणाऱ्या वस्तू धरून केवळ भारतीय मालच प्रदर्शनांत ठेवण्यांत येईल. कारखानदार अगर या देशांतील उद्योगधंद्यांतील भागीदार म्हणून काम करीत असलेल्या परकीय कारखानदारांनाहि या प्रदर्शनांत वस्तु ठेवतां येतील.

प्रदर्शनांतील मांडणी विषयवार व वस्तुनिहाय राहील. सर्व संघटित धंदे व प्रस्थापित व्यवसाय या संधीचा पूर्ण फायदा घेऊन या प्रदर्शनांत सहभागी होतील अशी आशा आहे.

या प्रदर्शनांतील गाळ्यासाठी, डायरेक्टर ऑफ एक्झिबिशन्स, मिनिस्ट्री ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री, उद्योग भवन, किंग एडवर्ड रोड, नवी दिल्ली, यांच्याकडे १५ जून, १९५८ पूर्वी अर्ज पाठवावेत.

## भारतांतील साखरेचा व गुळाचा दर माणशीं खप

### साखरेंत वाढ, गुळांत घट

| वर्षे | साखर (पौंड) | गूळ (पौंड) | एकूण (पौंड) |
|---|---|---|---|
| १९४७–४८ | ७·३ | २२·२ | २९·५ |
| १९४८–४९ | ९·० | १७·५ | २६·५ |
| १९४९–५० | ७·० | १७·२ | २४·२ |
| १९५०–५१ | ७·६ | २१·५ | २९·१ |
| १९५१–५२ | ७·७ | २०·३ | २८·० |
| १९५२–५३ | १०·० | १६·४ | २६·४ |
| १९५३–५४ | ११·० | १५·० | २६·० |
| १९५४–५५ (अंदाज) | ११·० | १७·० | २८·० |
| १९५५–५६ (अंदाज) | १२·० | १६·० | २८·० |

वरील तक्त्यावरून दिसून येईल, कीं दर माणशीं साखरेचा खप १९४९–५० ते १९५५–५६ ह्या मुदतींत ७०% वाढला आहे. त्याच मुदतींत गुळाचा खप कमी होत गेला.

### साखरेची निर्गत १९५६–५७ मध्यें कोठें झाली?

| देशाचें नांव | निर्गत (टन) |
|---|---|
| चीन | ३३,६२४ |
| पूर्व आफ्रिका | २९,४५४ |
| मलाया | २०,८३७ |
| सुदान | १४,८४७ |
| इराक | १३,०८५ |
| बर्मा | ११,६४३ |
| सिलोन | ५,१५८ |
| एडन | ८,०५० |
| सिंगापूर | ५,०९६ |
| ग्रेटब्रिटन | १,००२ |
| उत्तर व्हिएटनाम | ८२३ |
| पश्चिम आशियांतील इतर प्रदेश | ५,०४५ |

### साखरेवरील एक्साईज कराचें उत्पन्न

| | (कोटी रुपये) |
|---|---|
| १९५१–५२ | ८·४६ |
| १९५२–५३ | ९·९० |
| १९५३–५४ | १४·३६ |
| १९५४–५५ | ८·१३ |
| १९५५–५६ | १८·५६ |
| १९५६–५७ | २०·८८ |
| १९५७–५८ | ३७·६२ |
| १९५८–५९ | ४२·०० |

एक्साईज कराचा दर १९५३ ते ५५ हंड्रेडवेटास ३ रु. १२ आ. असा होता. सध्यांचा दर ११ रु. ४ आ. आहे.

### साखरेच्या किंमतींतील वांटेकरी

| | % |
|---|---|
| ऊंस | ४१ |
| कर | ३८ |
| पगार, मजुरी, पॅकिंग | ११ |
| उत्पादन खर्च | ५ |
| ओव्हरहेड व ठोक नफा | ५ |
| | १०० |

साखरेवर होणाऱ्या खर्चांपैकी प्रत्येक रुपयांतले ३८ पैसे सरकारला करांच्या मार्गे मिळतात!

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

| | |
|---|---|
| श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष) |

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ७०,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | म. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष. |
| रावसाहेब य. द. खोले. | श्री. चं. रा. राठी. |
| श्री. गो. बा. देवी | श्री. बा. ग. धंदुके. |

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : ३४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षे | : | २¾ टक्के |
| ३ वर्षे | : | ३ टक्के |
| ५ वर्षे | : | ३½ टक्के |
| १० वर्षे | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवीचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ११–७–५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

# बँक ऑफ पूना, लिमिटेड

**—शेड्यूल्ड बँक—**

ठेवीदार व खातेदार ह्यांनीं ठेवीच्या रूपानें ठेवलेल्या पैशांतूनच बँकेच्या प्राप्तींत वाढ होत असते. त्यांना त्याचा योग्य तो मोबदला मिळणें जरूर आहे.

बँकेच्या वाढत्या व्याजाच्या दराचा फायदा घ्या.

**—व्याजाचे दर—**

चालू खातें : अर्धा टक्का, सेव्हिंग्ज खातें : २॥ टक्के.

मुदत ठेव तीन ते बारा महिने : ४ टक्के.

तीन महिन्यांपेक्षां कमी मुदतीच्या ठेवीवर आकर्षक व्याज.

★ आमच्या सेव्हिंग्ज बँक ठेवीमधून पैसा परत घेतांना कितीहि रक्कम काढावयाची असली तरी पूर्वसूचनेची आवश्यकता नाहीं.

चौकशी—(१) ४५५ रविवार पेठ, (२) ३६१ सदाशिव पेठ, (३) डेक्कन जिमखाना, पुणें. (४) सांगली.

गो. गं. साठे
मॅनेजर

डी. आर. नाईक
चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.